# शिवाजी सायंस कॉलेजमध्ये "सायबर जागृती" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

मुंबई यथील एच. आर. कॉलेज ऑफ कॉमर्स येथील प्राध्यापक डॉ. नवीन पंजाबी यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित शिवाजी विज्ञान महाविद्यालयामध्ये सायबर जागृती यात्रा निमित्त नागपूरच्या सायबर गुन्हे शाखा आणि कॉम्पुटर व इलेक्ट्रोनिक्स विभाग, शिवाजी विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानाच्या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून संगणक विभागाचे प्रमुक प्रा. सुभाष पांडे उपस्थित होते. नागपूर सायबर गुन्हे शाखा प्रमुख श्री अतुल आगरकर हे सुद्धा प्रामुख्याने उपस्थित होते. त्याचप्रमाणे प्रा. रविकांत जुगेले, डॉ.जागेश्वर केचे व संगणक आणि इलेक्ट्रोनिक्स विभागातील प्राध्यापिका उपस्थित होत्या.




डॉ. नवीन पंजाबी यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक काळात होणाऱ्या विविध सायबर गुन्ह्यासंबंधी सहज-सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यानी आपल्या मोबाईल, लॅपटॉप, इत्यादीमध्ये मजबूत पासवर्ड, आपले कोणते फोटो अपलोड करावे किवा करू नये इत्यादी संबंधाने प्रश्नोत्तराच्या माध्यमातून सखोल मार्गदर्शन केले. सोशल मिडीयाबाबत सतर्कता बाळगा. इंस्टाग्राम, फेसबुक, Whatsapp, व इतर सोशल मिडीयाच्या वापराबाबत सतर्कतेचा इशारा दिला. वाढते सेक्सटोर्षण, फ्रॉड, हरवलेले मोबाइल शोध व ऑनलाइन फसवणूक थांबवण्याकरिता सुरु करण्यात आलेले सीईआयआर व एनसीसीआरपी पोर्टल यांच्या संबंधाने माहिती देण्यात आली.

याप्रसंगी श्री अतुल आगरकर यांनी सायबर गुन्ह्याच्या कथित घटनावर प्रकाश टाकला. जर अशाप्रकारे कुठला त्यांच्याशी संबंधित सायबर गुन्हा घडला असेल तर कुठे तक्रार नोंदवावी, किती वेळेच्या आत नोंदवावी यासबंधी मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार प्रदर्शन या कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. जागेश्वर केचे यांनी केले. याप्रसंगी संगणक आणि इलेक्ट्रोनिक्स विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.